**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात ९६ मतदारसंघात सुमारे ६२ टक्क्यांहून अधिक मतदान

- राज्यात चौथ्या टप्प्यात ५२ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद, नंदूरबारमध्ये सर्वाधिक तर पुण्यात सर्वात कमी मतदान

- कापूस उत्पादक शेतकऱ्यांना निवडणुकीनंतर ४ हजार कोटी रुपये देण्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं आश्वासन

- मुंबईत अवकाळी पावसाची हजेरी, घाटकोपरमध्ये जाहिरात फलक कोसळून तिघांचा मृत्यू, ५९ जण जखमी, राज्य सरकारचे चौकशीचे आदेश

**आणि**

- छत्तीसगडमधे बिजापूर जिल्ह्यात १४ नक्षलवाद्यांना अटक, गडचिरोलीत चकमकीत ३ नक्षलवादी ठार

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदान आज झालं. नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशात लोकसभेच्या ९६ जागांसाठी आज मतदान झालं. आंध्र प्रदेशातल्या सर्व २५ जागा, तेलंगणातल्या सर्व १७ जागा, उत्तर प्रदेशात १३, महाराष्ट्रात ११, मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगाल मधे प्रत्येकी आठ, तर बिहारमधे ५ जागांवर आज मतदान झालं. झारखंड आणि ओडिशातल्या प्रत्येकी ४ आणि केंद्रशासित प्रदेश जम्मू-काश्मीरच्या एका मतदारसंघाचाही या टप्प्यात समावेश आहे.

प्राथमिक आकडेवारीनुसार या टप्प्यात ६२ पूर्णांक ७३ शतांश टक्के मतदान झाल्याचं केंद्रीय निवडणूक आयोगानं कळवलं आहे. या टप्प्यात सर्वाधिक सुमारे ७६ टक्के मतदान पश्चिम बंगालमध्ये आणि सर्वात कमी साडे ३६ टक्के मतदानाची नोंद जम्मू-काश्मिरमध्ये झाली.

लोकसभा निवडणुकीच्या आजच्या चौथ्या टप्प्यासाठी एकूण १ हजार ७१७ उमेदवारांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद झालं. त्यात यामध्ये केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते गिरिराज सिंह, अर्जुन मुंडा, जी किशन रेड्डी, अजय कुमार मिश्रा; संयुक्त जनता दलाचे राजीव रंजन सिंह; समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव; काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी; तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोईत्रा आणि शत्रुघ्न सिन्हा MIM चे असदुद्दीन ओवेसी या प्रमुख उमेदवारांचा समावेश आहे.

<><><><>

निवडणूक आयोगानं आज, पश्चिम बंगालमधल्या बीरभूम आणि बहरामपूर लोकसभा मतदारसंघातल्या दोन मतदान केंद्रांच्या केंद्र अधिकाऱ्यांना हटवलं.

<><><><>

तेलंगणात काही महिला मतदारांच्या मतदार ओळखीची वैयक्तिकरित्या पडताळणी केल्याबद्दल हैदराबाद भाजपच्या उमेदवार के. माधवी लता यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मतदान सुरू असताना कोडंगल इथं पत्रकार परिषदेत भाजपवर राजकीय टीका करून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी मुख्यमंत्री ए रेवंथ रेड्डी यांच्या विरोधात भाजपनं निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे.

<><><><>

राज्यातल्या पुणे, शिरुर, मावळ, अहमदनगर, शिर्डी, नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद आणि बीड या ११ मतदारसंघात साडे ५२ टक्के मतदारांनी आज मतदानाचा हक्क बजावला.

सर्वाधिक सुमारे ६० टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद नंदूरबारमध्ये झाली. सर्वात कमी सुमारे ४४ टक्के मतदान शिरुरमध्ये झालं. पुण्यात सुमारे ४५ टक्के तर मावळमध्ये ४६ टक्के मतदानाची नोंद झाली.

**मतदारसंघ निहाय मतदानाची टक्केवारी याप्रमाणे आहे. -**

जळगाव- सुमारे ५२ टक्के

रावेर - ५६ टक्क्यांहून अधिक

जालना - ५९ टक्क्यांहून अधिक

औरंगाबाद - ५४ टक्के

अहमदनगर - ५३ पूर्णांक २७ शतांश टक्के

शिर्डी -५५ पूर्णांक २७ शतांश टक्के

बीड - ५८ पूर्णांक ३७ शतांश टक्के

**<><><><><>**

चौथ्या टप्प्यात आज राज्यातल्या एकूण २९८ उमेदवारांचं भवितव्य मतदानयंत्रात बंद झालं. या टप्प्यात रिंगणात असलेल्या महत्त्वाच्या उमेदवारांमध्ये केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, राज्य सरकारमधले मंत्री संदीपान भुमरे, पंकजा मुंडे, चंद्रकांत खैरे, मुरलीधर मोहोळ, रविंद्र धंगेकर, वसंत मोरे यांच्यासह विद्यमान खासदार हीना गावित, रक्षा खडसे, इम्तियाज जलील, अमोल कोल्हे, श्रीरंग बारणे, सुजय विखे-पाटील, सदाशिव लोखंडे यांच्यासारखे अनेक उमेदवार रिंगणात होते.

**<><><><><>**

राज्यातल्या कापूस उत्पादक शेतकर्यांसाठी ४ हजार कोटींची भावांतर योजना आणली असून निवडणुका संपल्या की शेतकर्यांच्या खात्यात थेट ४ हजार कोटी रुपये जमा केले जाणार असल्याचं भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं. भाजपाचे उमेदवार सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ त्यांनी आज धुळे मतदारसंघात सभा घेतली. काँग्रेस नेते राहुल गांधी हे

देशाचं नेतृत्व करण्यासाठी सक्षम नसून देशाला सुरक्षित ठेवू शकणार नाहीत, असं शहा यांनी म्हटलं.

अमित शहा यांनी पालघर जिल्ह्यांत वसईमध्ये महायुतीचे उमेदवार हेमंत सावरा यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. लोकसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीकडे कोणताही अजेंडा नसल्याची टीका शहा यांनी केली. मोदींनी देशाला सुरक्षित केलं असून दहशतवाद संपवला असल्याचं ही त्यांनी म्हटलं.

काँग्रेस पाकिस्तानची भाषा बोलत आहे. शहिदांचा अपमान करणे आणि कसाबची बाजू घेणे हा काँग्रेसचा देशद्रोहीपणा आहे, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या सभेत केली. तीन वर्षांपूर्वी पालघरमध्ये साधू हत्याकांड झाले होते. त्या खटल्यात महाविकास आघाडी सरकारने आरोपींना पाठिशी घालून न्याय दिला नाही, असा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

धार्मिक विभाजनाची भाषा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना शोभत नाही, अशी टीका काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी केली. मुंबईत पत्रकार परिषदेत ते आज बोलत होते. या निवडणुकीत भाजपाचा दारूण पराभव होणार असून इंडिया आघाडीचं सरकार येणार असल्याचा विश्वासही चेन्निथला यांनी व्यक्त केला.

इंडिया आघाडीचं सरकार येताच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला जाईल, असं वचन काँग्रेसनं दिलं आहे. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी ११ जुलै २०१४ ला मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी केंद्र सरकारकडे अहवाल सादर केलेल्या अहवालावर अजून निर्णय झाला नाही, असा आरोप जयराम रमेश समाजमाध्यमांवर केला.

भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी आणि मुरली मनोहर जोशी यांना पंच्याहत्तरी उलटल्याचं कारण दाखवून राजकारणातून बाजूला केलं गेलं. आता

नरेंद्र मोदी ७५ वर्षांचे झाल्यावर अमित शहा यांना प्रधानमंत्री करणार का, असा प्रश्नही त्यांनी विचारला.

**<><><><><>**

मुंबईत घाटकोपर परिसरात अवकाळी पावसानं जाहिरात फलक कोसळून तिघांचा मृत्यू झाला तर 62 जण जखमी झाले. याठिकाणी एकूण १०० हून अधिक जण अडकल्याचा अंदाज आहे. राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकाच्या तुकडीसह, पोलिस, अग्नीशमन दल आणि इतर यंत्रणा याठिकाणी बचावकार्य करत आहेत. जखमींवर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थोड्याच वेळापूर्वी इथं भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांचा आज संध्याकाळी उत्तर प्रदेशातील वाराणसीत मेगा रोड शो झाला. मोदींसोबत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथही होते. प्रधानमंत्री उद्या वाराणसी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

प्रधानमंत्री मोदी यांनी बिहारमधल्या हाजीपूर, मुझफ्फरपूर आणि सारण इथं सभा घेतल्या. त्यांनी सकाळी पाटणा शहरातील तखत श्री हरिमंदिर जी पटना साहिबला भेट दिली.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांची उत्तर प्रदेशातल्या रायबरेलीत जाहीर सभा झाली. केंद्रात काँग्रेस-I.N.D.I.A.ची सत्ता आल्यास पहिलं काम गरीब शेतकऱ्यांचं कर्ज माफ करणं हे असेल, असं आश्वासन त्यांनी दिले. काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी वाड्रा यांनी अमेठी इथं जाहीर सभा घेतली.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे नेते अनुराग सिंह ठाकूर यांनी आज हिमाचलप्रदेशातल्या हमीरपूर मतदारसंघातून नामनिर्देशन पत्र दाखल केलं. हिमाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री प्रेमकुमार धुमल त्यांच्या समवेत होते. अनुराग ठाकूर या मतदारसंघातून गेल्या ४ निवडणुकांमधे यशस्वी झाले आहेत. सिमल्याचे विद्यमान खासदार सुरेश काश्यप आणि काँग्रेसचे तिथले उमेदवार विनोद सुलतानपुरी यांनी ही आज आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले.

**<><><><><>**

भारत आणि इराण यांच्यातल्या चाबहार बंदर करारामुळे मोठ्या गुंतवणुकीचा, तसंच भारताचा मध्य आशियाशी संपर्काचा मार्ग मोकळा झाला आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. चाबहार बंदरामुळे आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण मार्गाशी भारत जोडला गेला आहे. पाकिस्तानातल्या कराची आणि ग्वादार या बंदरांना टाळून इराणमार्गे दक्षिण आशिया आणि मध्य आशिया दरम्यान नवा व्यापारी मार्गही या करारामुळे खुला झाला आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

छत्तीसगडमधे बिजापूर जिल्ह्यात, सुरक्षादलांनी आज १४ माओवाद्यांना अटक केली. मुटावेंडी-पेडिया भागात जिल्हा राखीव रक्षक आणि पोलीसांचं पथक शोधमोहिम राबवत असताना ही कारवाई केल्याचं पोलिस अधीक्षक जितेंद्र यादव यांनी सांगितलं. अटक केलेल्या माओवाद्यांकडून स्फोटकं आणि प्रचारसाहित्य जप्त केलं असल्याची माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, गडचिरोलीमधल्या भामरागड तालुक्यातल्या कतरंगट्टाच्या जंगलात सी- ६० पथकाच्या जवानांबरोबर झालेल्या चकमकीत आज ३ नक्षलवादी ठार झाले. यात २ महिला नक्षलवाद्यांचा समावेश आहे.

**//<><><><><> //**